# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u>** :- प्रभाग क्र. ३१ अंतर्गत असलेले कविवर्य सुरेश भट
**{क्रीडा व सांस्कृतिक विभाग}** सभागृह, रेशीमबाग नागपूर येथील सभागृहाच्या दुरूस्तीचे काम करणे करीता रू. ३,२०,४९,६०३/- रूपयाचे (तीन कोटी वीस लक्ष एकोनपन्नास हजार सहाशे तीन रूपये) रकमेचे प्राकलन पद क्र. A२६६०१३३०८१२ पदशिर्ष (सभागृहाच्या दुरूस्तीची कामे करणे) अंतर्गत विभागाद्वारे तयार केलेले आहे. सदर्हु रू. ३,२०,४९,६०३/- रकमेस प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निवीदा मागवुन हाती घेण्याचा व पद क्र. A२६६०१३३०८१२ अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप** :-

१. प्रस्तावित काम हे पद क्र. A २६६०१३३०८१२ पदशिर्ष (सभागृहाच्या दुरूस्तीची कामे करणे) अंतर्गत प्रस्तावित असुन सदर्हु कामास सन २०२५-२६ च्या आर्थिक वर्षात, सदर्हु पदा अंतर्गत राशी रू. ३,२०,४९,६०३/- चे प्रावधान प्राप्त आहे.
२. या कामास्तव मुख्य अभियंता सा.बां. विभाग यांनी SE/PWD/T.S./४८/२०२५-२६ दि. २३.०७.२०२५ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.
३. विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक** :- 400/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 19/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, क्रीडा व सांस्कृतिक विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. ३१ अंतर्गत असलेले कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग नागपूर येथील सभागृहाच्या दुरूस्तीचे काम करणे करीता रू. ३,२०,४९,६०३/- रूपयाचे (तीन कोटी वीस लक्ष एकोनपन्नास हजार सहाशे तीन रूपये) रकमेचे प्राकलन पद क्र. A २६६०१३३०८१२ पदशिर्ष (सभागृहाच्या दुरूस्तीची कामे करणे) अंतर्गत विभागाद्वारे तयार केलेले आहे. सदर्हु रू. ३,२०,४९,६०३/- रकमेस प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निवीदा मागवुन हाती घेण्याचा व पद क्र. A२६६०१३३०८१२ अंतर्गत तरतुद मुक्त करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.